# वाढत्या तापमानात केळी बागेत घ्यावयाची काळजी

डॉ. चंद्रशेखर पुजारी, प्रा. अंजली मेंढे, डॉ. विजयराज गुजर, चंद्रशेखर गुळवे

**उशिरा लागवड केलेल्या केळी बागेतील घड वाढीच्या अवस्थेत आहेत. सूर्यप्रकाश, पानांचे घर्षण व धुलीकण यामुळे घडांच्या बाह्य गुणवत्तेवर परिणाम होतो. घडांची गुणवत्ता खालावते. त्यासाठी घडावर पॉलिथिन पिशवीचे आवरण घालावे. सूर्यप्रकाशाच्या तीव्रतेमुळे घड सटकू नयेत, म्हणून देखील पॉलिथिन पिशव्यांचे आवरण आवश्यक असते.**



केळीचे घड स्कर्टिंग बॅगने झाकावेत.

एप्रिल, मे आणि जून या तीनही महिन्यांत दिवसाचे व रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. सध्या तापमानात कमालाची वाढ झाली आहे. कमाल तापमान व सूर्यप्रकाशाची तीव्रता वाढलेली आहे. अधिक तापमानाचा व तीव्र सूर्यप्रकाशाचा केळी पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम दिसून येतो. तसेच काही भागात वादळी वारे, गारपीट व अवकाळी पावसाने केळी पिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सध्याच्या स्थितीती केळी बागेची विशेष काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

## सिंचन व्यवस्थापन

- बागेभोवती शेवरीचे सजीव कुंपण केलेले नसल्यास, शेडनेट लावून घ्यावे. शेडनेट लावताना त्यांची उंची बागेतील झाडांच्या उंचीपेक्षा थोडी जास्त असावी.
- उन्हाळ्याच्या दिवसांत बागेत पाण्याचे काटेकोर नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. जून- जुलै लागवडीच्या बागेला १८ ते २० लिटर, ऑक्टोबर लागवडीस ९ ते ११ लिटर तर फेब्रुवारी- मार्च महिन्यातील लागवडीच्या बागेस ४.५ ते ६.५ लिटर पाणी प्रति झाड प्रतिदिन या प्रमाणे द्यावे.
- बागेत उसाचे पाचट, गव्हाचे काड, हरभऱ्याचा भुस्सा वापरून आच्छादन करावे.
- फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात लागवड केलेली बागेतील रोपे सध्या स्थिरावून शाकीय वाढीच्या अवस्थेत आहेत. अशा लहान रोपांचे उन्हापासून संरक्षन करण्यासाठी बागेभोवती दोन ओळींत ताग लावून घ्यावा. शक्य झाल्यास प्रत्येक झाडास क्रॉप कव्हर लावून सावली करावी.

## खत व्यवस्थापन

- फेब्रुवारी- मार्च मध्ये लागवड केलेल्या बागेस जमिनीतून खते देताना फक्त ८२ ग्रॅम युरिया द्यावा. ठिबक सिंचनातून खते देताना प्रति १ हजार झाडांना युरिया ४.५ किलो, मोनो अमोनिअम फॉस्फेट ६.५ किलो आणि म्युरेट ऑफ पोटॅश ३ किलो याप्रमाणे मात्रा द्यावी.
- मे- जूनमध्ये लागवड केलेल्या बागेत काही ठिकाणी घड वाढीच्या किंवा काढणीच्या अवस्थेत आहेत. अशा बागांना कोणत्याही प्रकारची खते जमिनीतून किंवा घडांवर फवारून देऊ नयेत. त्याचा काहीही उपयोग होत नाही. केवळ पाणी व्यवस्थापनाकडे लक्ष द्यावे.
- ऑक्टोबरमध्ये लागवड केलेल्या केळी बागेस जमिनीतून खते देताना युरिया ८२ ग्रॅम व म्युरेट ऑफ पोटॅश ८३ ग्रॅम प्रतिझाड मात्रा द्यावी. ठिबक सिंचनाद्वारे खत देताना प्रति १ हजार झाडांना युरिया १३.५ किलो व म्युरेट ऑफ पोटॅश ८.५ किलो प्रमाणे द्यावे.
- उन्हाची तीव्रता अधिक असल्याने बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढून झाडाच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. यासाठी सर्व अवस्थांतील बागांमध्ये केओलिन पावडर ८०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणात दर पंधरा दिवसांनी फवारणी करावी.

## घडांची काळजी

- गेल्या वर्षी मे- जून महिन्यामध्ये लागवड केलेल्या मृग बागेतील घड काढणीच्या अवस्थेत आहे. अशा बागेतील तयार घड काढून बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवावेत.
- घडांची काढणी शक्यतो सकाळी लवकर किंवा सायंकाळी तापमान कमी झाल्यावर करावी. घड अलगदपणे काढणी करून ते सावलीत आणून ठेवावेत.
- उशिरा लागवड केलेल्या केळी बागेतील घड वाढीच्या अवस्थेत आहेत. सूर्यप्रकाश, पानांचे घर्षण व धुलीकण यामुळे घडांच्या बाह्य गुणवत्तेवर परिणाम होतो. घडांची गुणवत्ता खालावते. त्यासाठी घडावर पॉलिथिन पिशवीचे आवरण घालावे. सूर्यप्रकाशाच्या तीव्रतेमुळे घड सटकू नयेत, म्हणून देखील पॉलिथिन पिशव्यांचे आवरण आवश्यक असते.
- उन्हाळी हंगामात घडांच्या वजनामुळे केळी झाडे वाकते. तसेच जोराच्या वाऱ्यांमुळे झाड खोडामध्ये मोडून नुकसान होते. यासाठी झाडांना आधार म्हणून बांबूच्या काठीच्या किंवा पॉलिप्रॉपिलीन पट्ट्यांचा आधार द्यावा.



केळी घडांना बांबुच्या काठ्यांनी आधार द्यावा.

☎ ०२५७-२२५०९८६

(अखिल भारतीय समन्वित फळ सुधार प्रकल्प, केळी संशोधन केंद्र, जळगाव)